# दुकानाचे शटर तोडून दुकानातील ९२,६५० /- रुपये किमतीचे नवीन जोडे चोरणारे चोरटे पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात.

फिर्यादी नामे सैय्यद शेर अली नजीर अली, रा. इंदिरा वार्ड, हिंगणघाट यांचे अभ्यंकर शाळेजवळ, सेंन्ट्रल वार्ड, हिंगणघाट येथे जिगर बुट हाउस नावाचे दुकान असुन दिनांक २९-०६-२०२१ चे १६.३० वाजता ते दिनांक ३०-०६-२०२१ चे ०७.३० वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने दुकानाच्या शटरचे लॉक तोडुन दुकानात प्रवेश करून दुकानात ठेवुन असलेले विविध प्रकारचे नविन जोडे किंमत ९२,६५० /- रू चा माल चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरून दिनांक ३०-०६-२०२१ रोजी पोलीस स्टेशन हिगणघाट येथे अप.क्र. ५५७/२०२१ कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपी नामे १) मोहन उर्फ अज्जु प्रकाश भुसारी, वय २१ वर्ष, २) रवी उर्फ मस्तान नागसेन लभाने, वय २३ वर्ष दोन्ही रा. संत चोखोबा वार्ड हिंगणघाट तसेच एका विधीसंघर्षित बालकास निष्पन्न करून आरोपीतांचे ताब्यातुन गुन्हयात चोरीस गेलेले विविध कंपन्यांचे नविन जोडे किंमत ९०,२००/- रू. आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेली एक निळे पांढरे रंगाचे मोपेड क्रमांक नसलेली टिव्हीएस कंपनीचे नायट्रो गाडी किंमत १,००,०००/- रूपये असा एकूण १,९६,२००/- रू चा माल हस्तगत करून गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री. दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. संपत चव्हान यांचे निर्देशाप्रमाणे पो.उप.नि. अमोल लगड, पोलीस अंमलदार विवेक बनसोड, पंकज घोडे, सुहास चांदोरे, प्रशांत वाटखेडे, उमेश लडके यांनी केली आहे.